Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# नेतृत्वः एक संकल्पना

**प्रा. डॉ. अंकुशराव अंबादासराव चव्हाण**
विभाग प्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक
मत्स्योदरी कला महाविद्यालय तिर्थपुरी
ता. घनसावंगी जि. जालना

नेतृत्व या संकल्पनेबद्दल एकमत दिसून येत नाही. त्यामुळे नेतृत्वाच्या व्याख्यामध्ये देखील बरीच मतभिन्नता दिसून येते. काही लेखकांनी कार्यवादाच्या आधारावर नेतृत्वाची व्याख्या करतांना म्हटले आहे की, नेतृत्व हे परिस्थिती अनुरुप कार्य असून ते कोणत्याही एखाद्या व्यक्तीमध्ये नसते. कार्यवादी लेखक परिस्थितीच्या संदर्भात कार्य करणाऱ्या (पुढाकाराचे कार्य ) व्यक्तीचा देखील पाठपुरावा करतात. म्हणून एखाद्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती ही वास्तविक पुढारी असतेच असे नाही. जसे मंत्रिमंडळात कित्येक वेळा स्त्रीवर्गातुन किंवा अनुसुचित जाती जमातीमधून एखादी व्यक्ती नियुक्त केली जाते. अशा वेळी तिच्यामधील नेतृत्व दुय्यम स्वरुपाचे मानले जातात.

**वेबस्टरने** :— एक व्यक्ती समजुन नेतृत्वाची व्याख्या केली आहे त्यांच्या मते — नेतृत्व म्हणजे अशी व्यक्ती कि जी समुहाला निर्देश देते, आज्ञांकित करते, अथवा प्रमुख म्हणून मार्गदर्शन करते.

**चार्लस मेरियम** — यांनी गुणाच्या आधारावर नेतृत्वाची व्याख्या केली त्यांच्या मते — नेतृत्व हे विशिष्ट प्रकारचे गुण असून ते एखाद्या व्यक्तीमत्वात दृष्टीगोचर होतात व हे गुण विशिष्ट समुहाच्या संदर्भात साकार होतात. विशिष्ट गुणांमुळेच पुढारी नेता आपल्या समुहाचे नेतृत्व करतो तसा हा गुण सिध्दांत नेतृत्वासंबंधीचा परंपरागत आहे. नेत्यामध्ये नेतृत्वाचे गुण असतात हे मान्य परंतु गुणांनाच नेतृत्व मागणे बरोबर नाही म्हणून राजकीय विश्लेषणाच्या दृष्टीने ही व्याख्या देखील अपूर्ण आहे.

**आर.एम.स्टॉगडीलने** — Meaning of Leadership Traits or Reperesentationया लेखात म्हटले आहे की,'नेतृत्व म्हणजे केवळ काही गुणांचा समन्वय अशी निष्क्रिय स्थिती नसून समुहातील परस्पर संबंधावर अवलंबुन असते. म्हणजेच सेलीगमनच्या शब्दात नेतृत्वात गुण व प्रत्यक्ष चालू संबंध याचा बराच प्रभाव असतो. वेगळ्या शब्दांत श्मीडरने म्हटले आहे की, नेतृत्व म्हणजे सामान्य हितसंबंधावर आधारीत अशा मार्गदर्शनाने ते निश्चित होतात. मराठी विश्वकोषामध्ये नेतृत्व म्हणजे पुढारीपण असा अर्थ सांगुन समुहाचे उद्दिष्ट

प्राप्त करण्यासाठी अनुयायी म्हणवल्या जाणाऱ्या लोकांना एकात्मतेने वागण्यास उत्तेजन देणारी ही एक वागण्याची पध्दत आहे.

संबंधाच्या आधारावर नेतृत्वाचा विचार करतांना काही मर्यादा आहेत. संबंधामुळे एक अनिश्चितता असते. कारण पुढाऱ्यांचा प्रभाव परिस्थितीनुसार कमी जास्त होउन परिस्थिती एक निर्णायक घटक बनू शकते. परिस्थितीच्या संदर्भात टेनेबन म्हणतात — उद्दिष्ट व संसुचन प्रक्रिया देखील त्यांत त्याने अंतर्भाव केला आहे. विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निर्दिष्ट संसुचन प्रक्रियेव्दारे परस्पर व्यक्तीमध्ये जो प्रभाव विशिष्ट परिस्थितीत निर्माण होतो त्याला नेतृत्व म्हणतात. सॉगडीलने व गिबच्या मते नेतृत्व निर्धारणात परिस्थिती अधीक प्रभावी असते. The Future of political science 1963 मधील Leadership Role च्या इंडेक्समध्ये लास्वेलने नेता व नेतृत्वाची व्याख्या करताना म्हटले आहे की, सार्वजनीक कार्यात प्रभावी सहभाग घेणारा तो पुढारी होय. नेतृत्व हे सल्ला देणे व्यवस्था करणे तथा उद्दिष्ट ठरविणे, समन्वय साधणे यापेक्षा अधीक काही आहे. क्रियाशील राजकारणी अथवा पुर्णकाळ सार्वजनीक काम करणारे या श्रेणीत येतात.

**नेतृत्वाचे घटक** :— (Elements of Leadership)

(१) नेता (पुढारी) Leader :- इतरावर प्रभाव पाडतो अशी व्यक्ती म्हणजे नेता होय. परंतु नेता व अनुयायी याच्या परस्परांवर प्रभाव पडत असतो तसेच समुहातील लोकप्रीय व्यक्ती म्हणजे नेता होय. समुहावर वर्चस्व म्हणजे नेतृत्व या व्याख्या देखील अपूर्ण आहेत.

**कॅटेल** :— एकुण समुहाच्या कार्यावर ज्या व्यक्तीचा निर्विवाद प्रभाव पडतो, जी व्यक्ती समुहामध्ये परिवर्तन घडवून आणू शकते, जीच्यामुळे समुहाचे मनोबल व समुहशक्ती टिकून राहते आणि जी समुहाच्या अभिवृत्तीमध्ये व परिणामी वर्तनात बदल घडवून आणू शकते ती व्यक्ती म्हणजे त्या समुहाचा नेता होय, मिलच्या शब्दात — नेता म्हणजे समुहास त्याच्या उद्दिष्टाप्रती व उत्कर्षाप्रत नेणारी यासाठी मार्गदर्शन करणारी मार्गातील अडचणीचे निराकरण करु शकणारी व समुहाकडून योग्य ते सहकार्य करवून घेउ शकणारी श्रेष्ठ दर्जाची व्यक्ती होय.

(२) **अनुयायी** — (Followers)

अनुयायी शिवाय पुढारी नाही अर्थात पुढाऱ्याशिवाय अनुयायी नाही. गटाचे सर्व सदस्य एकाच वेळी गटनेत्याचे अनुयायी असतात असे नाही, तसेच अनुयायी व पुढारी यांच्या भुमिका बदलत असतात. बरेच वेळा सक्रीय अनुयायी पुढारी बनतात. तसेच पुढाऱ्याच्या संशुचनावर त्यांच्या अनुयायावरील प्रभाव आणि अनुयायीच पाठींबा तथा समर्थन अवलंबुन असते.

हिम्पफिलच्या मते — गट हे भिन्न भिन्न पातळ्यावर नेतृत्वाच्या श्रृंखला निर्माण करतात बहुतांश गटामध्ये अनेक पुढारी असतात. तसेच पुढी व अनुयायी त्यांच्यामधील सिमारेषा धुसर स्वरुपाची असते. परिस्थितीनुरुप त्यात बदल होतात एखाद्या व्यक्तीला गटाने शक्ती दिली की तीचे पुढाऱ्यात रुपांतर होते. आपल्या शक्तीचा उपयोग इतर गटावर करुन आणि अशा अनेक गटामध्ये समन्वय प्रस्थापित करुन नेतृत्वाचा विस्तार केला जातो व त्याचबरोबर अनुयायी वर्गाचा देखील विस्तार होतो.

**विशिष्ट परिस्थिती** :— निरनिराळ्या अभिवृत्ती व मुल्यांच्या आधारावर भिन्न व्यक्ती व गट त्यांचा परस्परांमध्ये होणाऱ्या क्रिया प्रतिक्रीयामुळे जे परिणाम साकार होतात त्यांना परिस्थिती म्हटल जाते. परिस्थितीचे घटक १ गटातील व्यक्तीच्या परस्पर संबंधामुळे विशिष्ट परिस्थिती निर्माण होते. २. गटाचे सर्वसाधारण स्वरुप, ३. व्यापक अशा संस्कृतीचे स्वरुप की ज्यामध्ये गटाचे अस्तीत्व असते व ज्यामधून गटाचे सदस्य होतात. ४. ज्या पर्यावरणात गट काम करतो ती भौतिक परिस्थिती ५. गटातील सदस्याची गटाच्या मुल्यांसबंधीची धारणा. या सर्व घटकांचा परस्परांवर परिणाम होउन परिस्थिती बदलत असते. नविन सदस्य गटात आल्यामुळे देखील परिस्थितीत बदल होते.

**स्टॉमडोल** — विशिष्ट गुणविशेष व व्यक्तीमत्वामुळे व एखादी व्यक्ती पुढारी बनत नाही तर विशिष्ट परिस्थितीला व गटाच्या घटकांच्या त्या गुणवैशिष्टे व मुल्याबद्दल असलेल्या मुल्यमापनाच्या संदर्भात नेतेपण व अनुयायीपण अवलंबुन असते.

**उद्दिष्ट** — (Task) कोणताही मानव गट हा उद्देशहीन नसतो. उद्दिष्टांमुळे एक गट दुसऱ्या गटापासून भिन्न असतो.

**हेम्फील** — गटाचे विशिष्ट उद्दिष्टांमधील फरक हा भिन्न अपेक्षा व मागण्यामुळे असून त्यातुन नेतृत्व प्रक्रिया चालते. पुढरीपणा उद्दिष्टांला विशेष महत्व आहे. कित्येक वेळा गटाच्या उद्दिष्टांत बदल होउ लागला की परिस्थिती नुरुप मागण्या पुढे येउ लागतात त्यामुळे भिन्न गुणवैशिष्टांनी युक्त असे पुढारी व अनुयायी देखील परस्परांच्या संबंधातुन निर्माण होतात.उद्दिष्टाला अनुरुप सदस्य गटात समाविष्ट केले जातात उद्दिष्टपूर्ती व त्यासाठी उपयोगात आणावयाचे साधन तंत्र यामुळे नेतृत्व प्रक्रिया गतीमान होते. उदा. भारतीय स्वातंत्र लढा तसेच लक्षपूर्तीमध्ये होणारा विलंब या आधारावर देखील गटात मतभेद होवून नविन पुढारी पुढे येतात त्यामुळे नेतृत्वामध्ये उद्दीष्टाला विशेष महत्व आहे.

**संशुचन साधने** — (Instruments of Communication) नेतृत्वाच्या स्थानिक प्रादेशीक तथा राष्ट्रीय अशा भूमिका आहेत. स्थानिक पातळीवर नेता व अनुयायी यांच्यामध्ये परस्पर व्यक्तीगत संबंध असू शकतो. परंतु प्रादेशीक तथा राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांना संशुचनाच्या माध्यमातुन अनुयायाशी संपर्क साधावा लागतो.

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

अनेकाच्या समुहात एखादी गोष्ट प्रस्तापित करणे अथवा पसरविणे याला संसुचन म्हटले आहे. हे संकेत चिन्हे अथवा प्रतिमाव्दारे प्रसारीत केले जाते. संसुचन हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शिघ्र अथवा मंदगतीने वारंवार अथवा विलंबाने स्वस्त अथवा महागडे असू शकते. संदेश प्राप्त करणारे प्रत्यक्ष रितीने संदेश प्राप्त करतात. तसेच श्रोतृवर्गाला मिळणारा संदेश यांच्यामधील प्रभावी मुल्ये उद्दिष्टे व आकांक्षा पासून प्रेरणा प्राप्त करतो. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दुरचित्रवाणीमुळे (टी व्ही) एखाद्या व्यक्ती अथवा घटनेला अगदी नैसर्गिक रंगात लाखो करोडो लोक ऐकू व पाहू शकतात यासर्व बाबीचा नेतृत्व प्रक्रियेवर दुरगामी तथा सखोल परिणाम झाला आहे.

समाजात विशिष्ट धोरणावर सहमती निर्माण होउन समाज एकमत बनतो वर्तमानपत्रे साप्ताहिके, मासिके तथा पुस्तके याचा टि.व्ही रेडीयोपेक्षा पडणारा प्रभाव संथगतीचा आहे. वर्तमानत्रातील संपादकीय स्तंभ लेखकाचे राजकीय विश्लेषण जाहिराती तथा वार्ता याचा वाचकांवर प्रभाव पडतो पण त्याचबरोबर वाचकाच्या आवडी निवडीचा देखील वर्तमान पत्रावर प्रभाव पडतो.

व्यक्तीगत संपर्काच्या दृष्टीने पत्रव्यवहार दुरध्वनी टेलीफोन तार टेलीग्राम याचे स्थान वैशिष्टपूर्ण आहे. एका स्थानावरुन दुसऱ्या स्थानावरील चाहत्यांना भेटण्यासाठी मोटार रेल्वे विमान हेलीकॉप्टर ही वेगवान साधने देखील संशुचनात समाविष्ट केली जातात. एखाद्या दुरस्थ मोठ्या सभेला संबोधीत करणे काही महत्वपूर्ण चाहत्यांना प्रत्यक्ष भेटणे वार्तालाप करणे हे नेतृत्व प्रक्रियेत अत्यंत महत्वपुर्ण आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. Webster's new twentieth century dictionary of the English language cleave land and Newyork.
२. John kessel/ cole/ seeding a pleas for the study of political leadership micropolitics the New York P.26
३. कित्ता पृ. ५९
४. मराठी विश्वकोष खंड ८ वा महाराष्ट राज्य साहित्य संस्कृती मंडळ पृ. ७८१
५. Harold D Laswell the future of Political Science 1963
६. मराठी विश्वकोष खंड ८ वा महाराष्ट राज्य साहित्य संस्कृती मंडळ पृ. ८८८
७. Encyclopedia, p.92
८. जनार्धन ठाकुर, हे नेते जनतेचे, उत्कर्ष प्रकाशन पुणे १९७८